# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# निवडणुकांच्या रणसंग्रामातही सर्वपक्षीय नेत्यांचा एकत्रित दिवाळी फराळ

## गप्पांची रंगली मैफल : दिशा सोशल फाऊंडेशनचा उपक्रम







**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांचा सुरू असलेला रणसंग्राम, त्यात होणारे बेछूट आरोप - प्रत्यारोप, त्यामुळे तापलेले वातावरण, वर्षानुवर्षांचे हेवेदावे, कुरघोडीचे राजकारण... सगळं काही बाजूला ठेवून राजकीय पक्षांचे दिग्गज नेते, आमदार, खासदार, विधानसभा निवडणुकीतील उमेदवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बुधवारी (दि.३०) एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला. राजकारणात एकमेकांचे विरोधक तसेच प्रतिस्पर्धी उमेदवारांनी गळाभेट घेऊन एकमेकांना शुभेच्छा दिल्या. खेळीमेळीचे हास्यविनोदी वातावरण व धमाल किश्श्यांमुळे जवळपास चार तास गप्पांची मैफल रंगली.

दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने यंदा आठव्या वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले. वाकड येथील हॉटेल बर्ड व्हॅलीत झालेल्या या कार्यक्रमात खासदार श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार अमर साबळे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, माजी महापौर संजोग वाघेरे, दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, नाट्यनिर्माते राहुल भंडारे, राज्य नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शहराध्यक्ष शंकर जगताप, सचिन चिखले, माजी शहराध्यक्ष वसंत लोंढे, राहुल कलाटे, योगेश बाबर, सचिन साठे, माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, शत्रुघ्न काटे, मयूर कलाटे, सुरेश भोईर, धनंजय काळभोर, तुषार हिंगे, बाळासाहेब मोरे, संतोष कांबळे, महेश कुलकर्णी, अमित बाबर, विशाल यादव, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, इंद्रायणी बँकेचे संस्थापक ॲड. एस. बी. चांडक, उपायुक्त अण्णा बोदडे, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी अशोक मुंढे, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब विनोदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील पवार, शरीरसौष्ठव संघटनेचे राजेंद्र नांगरे, मनोज जरे, कलोपासकचे प्रदीप पाटसकर, अभिनेते नितीन धंदुके, ॲड. राजेश जाधव, प्रचिती जाहिरात संस्थेचे प्रशांत पाटील, सम्यक साबळे आदींनी हजेरी लावली.

दिशा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, उपाध्यक्ष संतोष बाबर यांनी मान्यवर पाहुण्यांचे स्वागत केले. माजी अध्यक्ष गोरख भालेकर, जगन्नाथ शिवले, माजी कार्याध्यक्ष सचिन साठे, खजिनदार नंदकुमार कांबळे आदींसह दिशा सोशल फाउंडेशनच्या सदस्यांनी संयोजन केले.

---

# पिंपरी चिंचवडमध्ये तीन ब्रिटिशकालीन बॉम्ब सापडले

## प्रेम लोक पार्क परिसरात हे बॉम्ब आढळले आहेत.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये तीन ब्रिटिशकालीन बॉम्ब आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या प्रेम लोक पार्क परिसरात हे बॉम्ब आढळले आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपच लिकेज काढण्यासाठी चिंचवड येथील प्रेमलोक पार्क येथील पाण्याच्या टाकीजवळ खोदकाम सुरू असताना कामगारांना तीन ब्रिटिशकालीन बॉम्ब आढळले आहेत. घटनास्थळी पोलीस, अग्निशमन दल, बॉम्ब शोधक आणि नाशक पथक दाखल झाले होते. या बॉम्ब सदृश्य वस्तूंचा कोणताही धोका नसून पोलिसांनी ते लष्कराच्या ताब्यात दिले असून पुढील तपास सुरू आहे.



---

# अजित गव्हाणे यांच्या प्रचारात घुमला 'राम कृष्ण हरी, वाजवा तुतारी'चा नारा

## अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.



**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ आज (बुधवारी) प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने गव्हाणे यांनी मतदारांशी संपर्क साधला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बुधवारी कार्यकर्त्यांनी मोठ्या जोशात त्यांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यावेळी "राम कृष्ण हरी वाजवा तुतारी" अशी घोषणा ठिकठिकाणी ऐकायला मिळत होती.

अजित गव्हाणे यांनी बुधवारी झंझावाती प्रचार दौरा केला. यावेळी नागरिकांनी फटाके वाजून त्यांचे स्वागत केले. महिलांनी ठिकठिकाणी त्यांचे औक्षण करून "विजयाचा तिलक" लावला. दिघी रोड, स्वामी समर्थ कॉलनी, शिवशक्ती मित्र मंडळ रस्ता, संभाजी नगर, आळंदी रोड, ओम साई कॉलनी, संत तुकाराम नगर, श्रीराम कॉलनी या ठिकाणी प्रचार दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी गव्हाणे यांनी नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या. येथील व्यापाऱ्यांशी त्यांना येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा केली. मतदारांशी संवाद साधताना येथील प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी परिवर्तन गरजेचे आहे असे यावेळी गव्हाणे म्हणाले. दरम्यान "राम कृष्ण हरी वाजवा तुतारी", तुतारी वाजणार बदल घडणार, अशा घोषणांनी भोसरी परिसर दुमदुमून गेला होता.

---

# छाननीमध्ये 4 उमेदवारांचे अर्ज ठरले अवैध

## नामनिर्देशन पत्रांची छाननी प्रक्रिया पार पडली.




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'ग' क्षेत्रीय कार्यालय, तिसरा मजला, थेरगाव येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामध्ये विहित मुदतीत ३२ उमेदवारांनी ४४ नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. या नामनिर्देशन पत्रांची आज छाननी प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी यावेळी वैध आणि अवैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांची घोषणा केली.

**वैध उमेदवारांची यादी :-**

रफिक रशिद कुरेशी, सचिन वसंत सोनकांबळे, सचिन अरूण सिद्धे, अतुल गणेश समर्थ, काटे विठ्ठल कृष्णाजी, ॲड. अनिल बाबू सोनवणे, भाऊसाहेब सोपानराव भोईर, शंकर पांडुरंग जगताप, काळे सतिश भास्कर, राजेंद्र मारूती काटे, विनायक सोपान ओव्हाळ, रुपेश रमेश शिंदे, रविंद्र विनायक पारधे, धर्मराज अनिल बनसोडे, ॲड. संदिप गुलाबराव चिंचवडे, मारूती साहेबराव भापकर, भरत नारायण महानवर, अरूण श्रीपती पवार, मयुर बाबु घोडके, सिद्धिक इस्माइल शेख, जावेद रशिद शेख, करण नानासाहेब गाडे, शिवाजी तुकाराम पाडुळे, राहुल तानाजी कलाटे, जितेंद्र प्रकाश मोटे, सिमा देवेंद्रसिंग यादव, राजेंद्र पुंडलिक गायकवाड, राजेंद्र आत्माराम पवार.

**अवैध उमेदवारांची यादी :-**

अश्विनी लक्ष्मण जगताप, आनंद सुरेश मोळे, जितेंद्र रामचंद्र वाडघरे, जसविंदर सिंग इंदूपाल सिंग रत्तू.

चिंचवड विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निरीक्षक मनवेश सिंग सिद्धू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या छाननी प्रक्रियेवेळी नामनिर्देशन पत्रे दाखल करणारे उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पुनावळेचे नाव जागतिक नकाशावर आणणार : शंकर जगताप

## कचरा डेपोच्या लढ्याला यश मिळवून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी मानले आमदार अश्विनी जगताप यांचे आभार; शंकर जगताप यांना विधानसभेत पाठवण्याचा पुनावळे ग्रामस्थांचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनीताई यांच्या माध्यमातून पुनावळे गावच्या विकासासाठी व गावातील समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या आमदार निधीमधून गावात अनेक विकासकामे वेगाने झाली. पुढील पिढीला आपल्या पुनावळे गावचा अभिमान वाटला पाहिजे, अशा पद्धतीने विकासाचा वेग वाढविण्यात येईल, अशी ग्वाही महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी दिली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी प्रचारानिमित्त आज पुनावळे गावचा दौरा केला. यावेळी ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरात नारळ वाढविण्यात आला. त्यानंतर झालेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत शंकर जगताप बोलत होते.



### शंकरभाऊंच्या विकासाच्या संकल्पनेला पुनावळे ग्रामस्थांचीही साथ : चेतन भुजबळ

» कचरा डेपोच्या संदर्भात मागील १५ वर्षांपासून पुनावळे ग्रामस्थांनी प्रचंड संघर्ष केला. कधी महामार्ग रोखला, कधी महापालिकेवर भव्य मोर्चे काढले, तर कधी उपोषणाचा मार्ग अवलंबला. तरीही हा प्रश्न मार्गी लागला नाही. मात्र स्व. लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनीताई यांच्या प्रयत्नांतून हा आमच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागला. त्यांच्या या ऋणातून उतराई होण्याची वेळ आली आहे. महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हेदेखील काम करणारे नेतृत्व आहे. त्यामुळे अशा काम करणाऱ्या नेतृत्वाला विधानसभेत पाठवून त्यांच्या विकासाच्या संकल्पनेला हातभार लावण्यासाठी आम्ही पुनावळे ग्रामस्थ सज्ज आहोत, अशा भावना चेतन भुजबळ यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ, भाजप शहर उपाध्यक्ष राहुल काटे, हुशारआण्णा भुजबळ, रामचंद्र दर्शले, चंद्रकांत दर्शले, अशोक काटे, पोलीस पाटील दिलीप दर्शले, राहुल ढवळे, अजिंक्य गायकवाड, रामदास मदने, तानाजी शिंदे, शंकर गायकवाड, माऊली दर्शले, सुरेश भुजबळ, निवृत्ती भुजबळ, सचिन गायकवाड, अक्षय भुजबळ, चेअरमन पोपट पांढरे, संभाजी शिंदे, संतोष भुजबळ, संभाजी शिंदे, रोशन दर्शले, मंगेश भुजबळ, संभाजी भुजबळ, रोहिदास मदने, राहुल भुजबळ, विलास बोरग, महेंद्र कोयते, कैलास भुजबळ, चिंटू सिंग, दादा ढवळे, सदाशिव गायकवाड, निवृत्ती दर्शले, राजेश भुजबळ, धनंजय कोयते, दिगंबर कोयते, लक्ष्मण कोयते यांच्यासह पुनावळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगताप म्हणाले की, पुनावळे येथे नियोजित कचरा डेपोच्या प्रश्नासंदर्भात मागील १५ वर्षांपासून येथील रहिवाशांचा संघर्ष सुरू होता. लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊंनी हा कचरा डेपो प्रकल्प रद्द व्हावा यासाठी सातत्यपूर्ण राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्यासंदर्भात राज्य शासनही गंभीर होते. मात्र भाऊंचे अकाली दुःखद निधन झाले. त्यांच्यानंतर आमदार अश्विनीताईंनी या विषयासंदर्भात विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी उपस्थित केली. अखेर त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले. आणि कचरा डेपोचा प्रकल्प रद्द झाला. विशेष म्हणजे या कचरा डेपोच्या जागी आमदार अश्विनीताईंनी ऑक्सिजन पार्क प्रकल्प उभारण्याची मागणी केली. त्यासंदर्भात यशस्वी पाठपुरावा केला. अखेर या प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली. त्यासाठी खर्चाची तरतूदही करण्यात आली आहे. या ऑक्सिजन पार्कमुळे पुनावळे गावच्या लौकिकात भर पडणार आहे.

त्याचबरोबर गावातील १२ मीटर आणि १८ मीटर रुंदीचे डी.पी. रस्ते, अंर्तगत रस्त्यांचे डांबरीकरण, पावसाळी पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी स्टॉर्म वॉटर लाईनची कामे, नागरिकांना रस्त्याने व्यवस्थित चालता यावे यासाठी पदपथ, सार्वजनिक रस्त्यांवर दिवाबत्तीचे पोल, टी जंक्शन येथे वाहतूक बेटाची निर्मिती आणि सुशोभीकरणाची कामे ही सर्व विकासकामे आमदार स्व. लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनीताई यांच्या निधीतून आपण केली. तर राम मंदिर परिसरातील सभा मंडप बांधण्याच्या कामालाही मंजुरी मिळालेली आहे. तेही काम लवकरच चालू होईल.

पुढील काळात गावातील कोणत्याही शेतकऱ्याचे अथवा ग्रामस्थांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेत पुनावळे गावाच्या विकासाचा आलेख असाच चढता राहील, यासाठी मी देखील स्व. लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनीताई यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करीन, अशी ग्वाही शंकर जगताप यांनी ग्रामस्थांना दिली.

# नवले पूलावर अपघात; एक ठार

## या अपघातामुळे नवले पूलावर काही वेळ मोठी वाहतूक कोंडी झाली



**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील नवले पूलावर थांबलेल्या क्रेनला ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेत एकाच मृत्यू तर एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. दुपारी अडीचच्या सुमारास हा अपघात झाला.

अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रज चौकापासून नवले ब्रीजच्या दिशेने भरधाव वेगाने MH 25 AJ 1005 या क्रमांकाचा ट्रक जात होता. त्यावेळी ट्रकचा ब्रेक झाल्याचं चालकाच्या लक्षात आलं. तेव्हा गाडीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करीत असताना नवले ब्रीजवर उभे असलेल्या MH 06 AL 4135 या क्रमांकाच्या क्रेनला जोरात धडक दिली. या घटनेमध्ये ट्रकमध्ये दोघेजण अडकल्याचं समोर आलं. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळविण्यात आले. त्यानंतर अग्निशमन दलाचे अधिकारी, कर्मचारी काही मिनिटात घटनास्थळी दाखल झाले.

कटरच्या साहाय्याने ट्रकचा काही भाग कापण्यात आला, दोन जखमींना बाहेर काढण्यात आले. या दोघांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असता काही वेळत त्या दोघांपैकी एकाच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तर एकजण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे नवले पूलावर काही वेळ मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

# अवाजवी भाडेवाढवर आरटीओचा अंकुश

## तब्बल सात पथक खासगी प्रवासी वाहतुकीची तपासणी करणार आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड आरटीओ अंतर्गत तब्बल सात पथक खासगी प्रवासी वाहतुकीची तपासणी करणार आहेत. दिवाळी सुट्टीच्या काळामध्ये तिकिटाच्या दराची विक्री अधिक होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही तपासणी सुरू असणार आहे. नागरिकांची मोठ्या प्रमाणात तिकिटाच्या माध्यमातून होणारी लूट थांबविण्यावर आरटीओचा अंकुश असणार आहे.

दिवाळीमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांना यंदा प्रवासासाठी तिप्पट ते चौपट अधिक भाडे मोजावे लागणार आहे. शहरातील काही ट्रॅव्हल्स कंपन्यांनी नेहमीच्या भाड्यात मोठी वाढ केली आहे. ऐन दिवाळीत प्रवाशांचे दिवाळे काढण्याचा हा प्रकार असून, या भाडेवाढीवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने प्रवाशांची लूट होत असल्याचा सूर प्रवाशांमध्ये आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आरटीओच्या निरक्षणामध्ये प्रवाशांकडून जादा तिकिट वाढीबाबत एकही तक्रार दाखल झाली नव्हती. त्यामुळे यंदा प्रवाशांनी जागृत राहून तक्रार करावी, असे आवाहन आरटीओच्यावतीने करण्यात आले आहे. एसटीच्या भाड्यापेक्षा दीडपट भाडेवाढ करता येते. मात्र, त्यापेक्षा जास्त वाढ केल्यास यावर कारवाई होऊ शकते. मात्र, अशी कारवाई झालेली आजपर्यंत निदर्शनास आलेली नाही.



> “शहरात सात पथकांची नेमणूक करण्यात आली. निवडणुकीच्या कामाची जबाबदारी स्वीकारून शहरातील खासगी वाहतूक चालकांवर देखील कारवाई सुरू केली आहे. नागरिकांनीही आरटीओकडे तक्रारी कराव्यात.”
> **- संदेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी**

> “कोल्हापूरला दरवर्षी दिवाळीत जातो. नेहमीपेक्षा यावर्षी तिकिटाचे दर वाढवले आहेत.”
> **- सागर कांबळे, नोकरदार.**

पिंपरी-चिंचवडमध्ये नोकरी उद्योग व्यवसाय आणि शिक्षणासाठी रहिवासी असलेल्यांची संख्या मोठी आहे. दिवाळीसाठी हजारोंच्या संख्येने गावी जातात. रेल्वेचे आरक्षण तीन महिन्यांपूर्वीच फूल झाले आहे. एसटीची तिकिटे मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे दिवाळीसाठी खासगी प्रवासी बस तिकिटांवर अवलंबून राहावे लागते. या परिस्थितीमध्ये बसचालक अव्वाच्या सव्वा दर आकारत असल्याने या चालकांची मनमानी सुरू आहे. त्यामुळे प्रवाशांच्या खिशाला कात्री बसत आहेत. मात्र, याबाबत तक्रार नेमकी कोठे करायची, याची माहिती नसल्याने खासगी वाहन चालकांकडून लूट सुरूच आहे. त्यावर आता आरटीओ आळा घालणार आहे.

# अरुण पवारांनी दाखल केला अपक्ष उमेदवारी अर्ज

## संभाजी ब्रिगेड, छावा मराठा युवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, छावा संघटनेचा अरुण पवार यांना पाठिंबा

**पिंपरी | प्रतिनिधी**

हजारो चिंचवडकराच्या साक्षीने सामाजिक कार्यकर्ते तथा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे विश्वासू सहकारी व समर्थक अरुण पवार यांनी भव्य रॅली द्वारे शक्तीप्रदर्शन करीत आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, वाढती बेरोजगारी, वाहतूक कोंडी, नदी प्रदूषण या महत्त्वाच्या समस्या सोडविणार असल्याचे अरुण पवार यांनी सांगितले.

अरुण पवार यांनी पिंपळे गुरव येथील निवासस्थानापासून कार्यकर्त्यांसमवेत जुनी सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, रहाटणी गाव, काळेवाडी, थेरगाव अशी दुचाकी भव्य रॅली काढत 'ग' क्षेत्रीय कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्याकडे अर्ज सादर केला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रा.गंगाधर बनबरे, छावा मराठा युवा मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष धनाजी येळकर पाटील, मनोज गायकवाड, प्रदेश उपाध्यक्ष



अभिमन्यू पवार, शहराध्यक्ष प्रवीण कदम, धारूरचे सरपंच बालाजी पवार, प्रकाश इंगोले, जिजाऊ ब्रिगेडच्या सुनीता शिंदे, युवराज माने, किशोर अट्टरगेकर, संजय जाधव आदी उपस्थित होते.

मराठा आरक्षण लढ्यात अरुण पवार यांचा सक्रिय सहभाग असून, चिंचवड विधानसभा मतदारसंघात मनोज दादा जरांगे पाटील पॅटर्न नक्कीच चालणार आहे. अरुण पवार यांना निवडून आणायचेच असा चंग मराठवाड्यातील चिंचवडकर रहिवाशांनी बांधला आहे. अरुण पवार यांनी अर्ज दाखल केल्याने चिंचवड मतदारसंघात चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे. मराठवाडा जनविकास संघाच्या माध्यमातून गेली तीन दशकापासून अरुण पवार यांनी चिंचवडसह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक कार्य उभे केलेले आहे. सामाजिक नाळ जपत त्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. याचबरोबर पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन केले आहे. तसेच लाखाहून अधिक नागरिकांना वृक्ष रोपांचे वाटप केले आहे.

यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना अरुण पवार म्हणाले,

» संविधानिक लोकशाहीच्या रक्षणासाठी चिंचवड विधानसभेवर अरुण पवार यांनाच निवडून आणण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, संभाजी ब्रिगेड, छावा मराठा युवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, छावा संघटना यांचा पाठींबा अरुण पवार यांना देण्यात आला आहे.

की सर्वच घटकांचा विकास करण्यासाठी मी या लढाईत उतरलो आहे. सर्वसामान्य नागरिक मतदारासह समाजातील सर्व समाज घटकांचा उत्स्फूर्त पाठींबा मिळत आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रा. गंगाधर बनबरे यांनी सांगितले, की पिंपरी-चिंचवड शहरातील गतिमान विकास करण्यासाठी, तसेच नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपल्यातीलच एक सामान्य माणूस चिंचवड विधानसभा निवडणुकीत उतरत आहे. आम्ही सर्व अरुण पवार यांच्यासोबत असून, त्यांना मताधिक्याने आमदार करण्यासाठी पुढाकार घेऊन काम करणार असल्याचे सुनीता शिंदे यांनी सांगितले.



# 'दिवाळी पहाट' कार्यक्रमात मतदानाचा संकल्प

## देशाचे भवितव्य अधिक उज्ज्वल, पारदर्शक आणि न्याय्य होईल : सुमारे 700 नागरिकांनी केला मतदानाचा संकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळीत जसे प्रत्येक घरात दीपप्रज्वलन केले जाते, तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या मताचा दीप लोकशाहीच्या निवडणूकरुपी उत्सवात लावावा. त्यातून देशाचे भवितव्य अधिक उज्ज्वल, पारदर्शक आणि न्याय्य होईल, असा संदेश देत महापालिकेच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रमात सुमारे ७०० मतदारांनी मतदान करण्याचा संकल्प केला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीच्या वतीने निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आला. यावेळी साहाय्यक आयुक्त पंकज पाटील,



गायक पं. अजितकुमार कडकडे, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, कलाकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भोसरी औद्योगिक वसाहतीतील कामगारांनी घेतली मतदान करण्याची शपथ

भोसरी औद्योगिक वसाहतीतील कामगारांनी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याबाबत शपथ घेतली. कामगारांच्या भवितव्यासाठी आवर्जून मतदान करणार असल्याची भावना कामगारांनी यावेळी व्यक्त केली. तसेच टॅकलक्राफ्ट कंपनीचे संचालक नीलेश मोहिते यांनी कामगारांना मतदान करण्यासाठी पगारी सुट्टी देणार असल्याचे सांगितले.

### डॉक्टर्स, नर्स, कर्मचारी आणि रुग्णांच्या नातेवाईकांचा मतदान करण्याचा निर्धार

भोसरी येथील महापालिकेच्या नवीन भोसरी रुग्णालयातील डॉक्टर, नर्स, कर्मचारी आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी येत्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचा निर्धार केला असून महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या मतदार जनजागृती मोहिमेची माहिती परिसरातील लोकांना देऊन नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणार असल्याचे मत रुग्णालयातील परिचारिकांनी व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा लोखंडे यांच्यासह डॉक्टर, नर्स, रुग्णालयातील कर्मचारी आणि रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

### मजुरांनी घेतली मतदानाची शपथ

» कुदळवाडी आणि भोसरी येथील मजूर अड्डयावर मजुरांनी सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान करण्याचा संकल्प केला. यावेळी महापालिकेचे कर्मचारी यांच्यासह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांच्या मताचे महत्त्व कामगारांना पटवून देण्यासाठी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या पथनाट्याच्या माध्यमातून मतदारांचे प्रबोधन तसेच मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सुविधांबाबत माहिती देण्यात येत आहे.

# पारदर्शकपणे करा निवडणुकीचे काम

## जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षाला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची भेट

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेमध्ये माध्यम कक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून निवडणूक प्रक्रियेदरम्यान माध्यम कक्ष समन्वय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निरपेक्षपणे व पारदर्शकपणे कामकाज करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षाला डॉ. पुलकुंडवार यांनी भेट दिली त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे, निवडणूक उपजिल्हाधिकारी मिनल कळसकर, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्ष समन्वयक डॉ. रवींद्र ठाकूर, निवडणूक शाखेच्या तहसीलदार शीतल मुळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे साहाय्यक प्राध्यापक योगेश बोराटे, साहाय्यक संचालक जयंत कर्पे यावेळी उपस्थित होते.

विविध माध्यमांमधील जाहिराती आणि पेड न्यूजबाबत कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती डॉ. पुलकुंडवार यांनी घेतली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाविषयी माहिती दिली.

जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्ष समन्वय अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, साहाय्यक संचालक जयंत कर्पे यांनी माध्यम कक्षातर्फे तयार करण्यात येणाऱ्या विविध अहवालांची माहिती दिली.

माध्यम कक्षात सुमारे १० दूरचित्रवाणी संचांच्या माध्यमातून वृत्तवाहिन्यांतील निवडणूक प्रचार, जाहिरात, पेड न्यूज आदींच्या अनुषंगाने संनियंत्रण केले जात आहे. तसेच सोशल मीडियावरील पोस्टबाबतही बारकाईने संनियंत्रण केले जात आहे. वृत्तपत्रातील जाहिराती आणि पेड न्यूजबाबतही दररोजच्या वृत्तपत्रांचे अवलोकन केले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीसाठी स्थापन करण्यात आलेल्या सी-व्हीजील आणि निवडणूक खर्च कक्षालाही विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी भेट दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कामकाजाकरीता जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ नुसार संबंधित विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांना आवश्यक विविध आस्थापनांच्या मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये संबंधित मतदारसंघातील शाळा, महाविद्यालये, शासकीय, निम-शासकीय कार्यालये, विविध आस्थापना, केंद्र शासन व सहकारी संस्था, बँका व खासगी आस्थापनांकडील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

सर्व २१ विधासभा मतदारसंघात निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण त्या त्या मतदारसंघात २६ व २७ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे, त्यामुळे अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याबाबत नोंद घेऊन तत्काळ निवडणूक कर्तव्यावर हजर व्हावे, असेही डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले आहे.

### गैरहजर राहिल्यास होणार कारवाई : डॉ. सुहास दिवसे

» **निवडणूक कामकाजांतर्गत प्रथम प्रशिक्षणास विनापरवानगी गैरहजर राहून हलगर्जीपणा केल्याबद्दल लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ३२ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याने संबंधित गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांनी तत्काळ निवडणूक कर्तव्यावर हजर व्हावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत.**

# दिवाळीतील हवा अन् ध्वनिप्रदूषणावर नजर!

## पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील महत्त्वाच्या ठिकाणांवर लक्ष : सहा ठिकाणी हवा प्रदूषणाची नोंदी घेतल्या जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे हवा प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होते. या प्रदूषणावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बारकाईने लक्ष ठेवणार आहे. दिवाळीत ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर या दोन दिवसांत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील १२ ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची नोंद करण्यात येणार आहे. याचवेळी सहा ठिकाणी हवा प्रदूषणाची नोंदी घेतल्या जाणार आहेत.



मागील काही काळापासून हवा प्रदूषणासोबतच ध्वनि प्रदूषणाची वाढ होत आहे. दोन्ही शहरांचा विस्तार सुरू असून, अनेक ठिकाणी बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांमुळे मोठी धूळ निर्माण होऊन हवा प्रदूषणात वाढ होत आहे. त्यातच वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यानेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. वाहनांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या आवाजानेही ध्वनिप्रदूषण वाढत आहे. याचबरोबर सामाजिक, राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमात मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावण्यात येत असल्यानेही ध्वनिप्रदूषणात वाढ होत आहे.

शहरातील हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढलेले असताना दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे त्यात आणखी भर पडते. फटाक्यांच्या धुरामुळे हवेची पातळी विषारी बनते. याचवेळी त्यांच्या मोठ्या आवाजामुळे लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास होता. सातत्याने मोठा आवाज कानावर पडल्याने बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिवाळीच्या काळात हवा आणि ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या जातात. या नोदींच्या आधारे शहरातील प्रदूषणाचा तुलनात्मक अभ्यास शक्य होतो.

> दिवाळीच्या काळात प्रदूषणात मोठी वाढ होते. या प्रदूषणाच्या नोंदी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतल्या जाणार आहेत. या नोंदीच्या आधारे प्रदूषणाच्या पातळीत होणारी वाढ समजू शकेल. यानुसार त्यावर उपाययोजना करता येतील.
>
> **- कार्तिकेय लंगोटे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

### ध्वनिप्रदूषण नोंदीची ठिकाणे

» **साखर संकुल (शिवाजीनगर), नळ स्टॉप (कर्वे रस्ता), सिटी प्राईड (सातारा रस्ता), स्वारगेट, शासकीय मनोरुग्णालय (येरवडा), खडकी बाजार, शनिवारवाडा, लक्ष्मी रस्ता, सारस बाग, औंध गाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रस्ता.**